# स्वातंत्र्यासाठीचे भाषण दि. 15 ऑगस्ट 2011

माननीय पाहुणे मंडळी, आदरणीय मुख्याध्यापक व शिक्षक वृंद, आणि तुम्ही सर्व माझे विद्यार्थी मित्र–मैत्रिणींनो; माझे नांव निकीता पाटील आहे. मी आठव्या वर्गात शिकते. दोन वर्षांनंतर मी यावर्षी शाळेत जात आहे, स्वातंत्र्य दिनी तुमच्या पुढे भाषण करण्याचे स्वातंत्र्य मिळाले, याचा मला खुप आनंद झाला आहे. आजच्या भारतीय स्वातंत्र्य दिनच्या पावन पर्वावर मी तुम्हां सर्वांचे अभिनंदन करते.

इंग्रजांच्या गुलामगिरी विरूद्ध छोट्या–छोट्या मुलांपासून तर मोठ–मोठ्या नेत्यांनी अनेक वर्षांपर्यंत लढा दिला. त्यातून अखेर आपला देश, म्हणजे आपण सर्व भारतीय 15 ऑगस्ट 1947 रोजी स्वतंत्र झालो. हा इतिहास तुम्हां सर्वांना माहीतच आहे. त्यामुळे मी त्याबद्दल आणखीन बोलणार नाही. आपल्यावरच्या दुसऱ्या एका गुलामगिरी बद्दल आणि त्याविरूद्ध स्वातंत्र्याच्या लढाई बद्दल मी बोलणार आहे.

मी लहान असतांनाच मला समजले होते की मी माझे न ऐकणाऱ्या शरीरात कैद झाली आहे. याला 'क्वॉड्रीप्लेजिया' नावाचे अपंगत्व म्हणतात. बघा माझी मान माझ्या मर्जीविरूद्ध हालत राहते. तोंड आपोआप वेडेवाकडे होऊन जाते. हात–पाय–बोटेही माझ्या मर्जीने सर्व हालचाली करीत नाहीत. अश्या माझ्या शरीराच्या कैदेत मी हळूहळू स्वालंबनाने जगायला शिकू लागली. तेव्हा मला समजले की माझ्या शरीरापेक्षाही मोठ्या एका कैदेत किंवा गुलामगिरीत मी अडकली आहे, ती म्हणजे 'लोकांची मानसिकता'.

आजच्या काळात अनेक लोक आपल्या मुलींना आईच्या पोटात असतांनाच मारून टाकतात, असे मी ऐकलेले आहे. परंतु मी एक मुलगी आहे, गुलामीत अडकली आहे, असे असतांनाही माझे आई–बाबा मोल–मजुरी करून मला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी झटत आहेत. त्यांना माहीत आहे की खूप–खूप शिक्षण फक्त माझी गुलामगिरी संपवू शकेल, मला स्वतंत्र करू शकेल. म्हणून याला भेट त्याला भेट, या नाही तर त्या मास्तराच्या पाया धर, असे करीत करीत त्यांनी मला शाळेत घातले.

माझ्या दोन्ही हातांची बोटे खूप वेडेवाकडे असल्याने मला पेन धरता येत नाही. पाय आणि तोंड पण वाकडे असल्याने त्याने पेन धरून लिहणे जमत नाही. यावर उपाय शोधण्यात मदत करण्याऐवजी सर्वजण मला शाळेतून हाकलून देण्याच्याच मागे लागले होते. सहावीत असतांना मी ज्या निवासी शाळेत शिकत होती, तिथे मी दर महिन्याला पाचशे रूपये देऊ शकत नाही म्हणून मला फरशी पुसायला, संडास साफ करायला लावायचे. कितीही भूक लागलेली असली तरी एकच पोळी जेवायला द्यायचे. मला खूप दुःख व्हायचे. मी रडत राहायची. अभ्यासात मन नाही लागायचे. शेवटी माझी आई मला तिथून घरी घेऊन आली.

ज्या–ज्या शाळेत माझ्या आईने ॲडमिशनसाठी प्रयत्न केला सर्वांनी एकच सांगितले की मला लिहता येणार नाही म्हणून शाळेत घेता येत नाही. अंजनगावबारीच्या शाळेत पण मला ॲडमिशन मिळाली नाही. दोन वर्ष मी घरीच राहिली. दाराशी बसून शाळेत जाणाऱ्या मुला–मुलींना बघत राहायची. मला शाळा कां नाही म्हणून रडत राहायची.

यावर्षी उन्हाळ्यात अंजनगावबारीवरून बडनेऱ्याला जातांना ऑटोरिक्षामध्ये मला एक सर भेटले. ते कोणत्याही शाळेत शिकवत नाही परंतु माझ्यासारख्या मुलांना शाळेत जाण्यासाठी मदत करतात. मला आईसोबत घरी बोलावून त्यांनी माझी सर्व विचारपूस केली. माझे मेडीकल सर्टिफिकेट बघीतले. अमरावतीला कोणत्या ठिकाणी कोणत्या ऑफिस मध्ये जाऊन कोणत्या साहेबांना भेटायचे आहे, सर्व समजावून सांगितले. त्या मोठ्या साहेबांनी फोन केला तर बघा कसा फरक पडला. त्या शाळावाल्यांनी मला सहावीची टी.सी. घरी आणून दिली आणि मला या शाळेत एकदम आठवीत ॲडमिशन घेता आली.

भारतात 'अपंग व्यक्ती कायदा 1995' आणि 'शिक्षण हक्क कायदा 2009' प्रमाणे मला विना अडथळा शिक्षण घेता येते, हे मला आता माहीत झाले आहे. परीक्षेत पेपर लिहण्यासाठी सरकारकडून लेखनीक मिळण्याची सोय आहे.

पण लोकांची मानसिकता बघा. मला गुलामगिरीत ठेवतात. शिकण्याची संधी मिळू देत नाही. मोठ्या लोकांची हीच वागणूक लहान मुलं पण शिकलेले आहेत. मला शाळेत जाण्यात, लिहून देण्यात, मदत करण्याऐवजी, मला टपली मारून पळून जातात. लोकांनी माझ्याबाबतीत अशी मानसिकता ठेवणे बरोबर आहे काय?

मी एकटी नाहीये. भारतात 1 कोटींपेक्षाही जास्त अपंग मुलं अश्या गुलामगिरीत जगत आहेत. इंग्रजांच्या गुलामगिरीविरूद्ध भारतीयांनी लढा दिला होता. तसाच लढा भारतीयांच्या गुलामगिरीविरोधात आम्ही अपंग भारतीयांनी द्यायचा काय? आम्ही पण भारत मातेचे लाडके लेक आहोत. शूरवीर. गरज पडली तर आपल्याच लोकांच्या या मानसिकतेविरूद्ध लढू. पण कशाला ही वेळ येऊ द्यायची.

आजचा स्वातंत्र्य दिन तुम्हां–आम्हां सर्वांचा आहे असे आम्हां अपंग मुलांना वाटायला लागेल तेव्हा बघाल आपला तिरंगा कसे डौलाने फडकेल. सर्व जगातून भारत मातेचा जयजयकार होईल. आज तुम्हां सर्वांना ही विनंती करीत मी म्हणते – जय हिंद!



निकिता रमेश पाटील, वय 17 वर्षे, जन्मतः 'क्वॉड्रीप्लेजिया' मुळे आलेल्या 80 टक्के अपंगत्वासह सन्मानाने जगण्यासाठी प्रयत्न करीत आहे. आपले आई–वडील, लहान बहीण व भाऊ सोबत सद्या ती मु.पो. अंजनगावबारी, ता.जि. अमरावती, पिन–444701; येथे राहते. गावातीलच जनता विद्यालयात आठव्या वर्गात शिकत आहे.